.. Shri Krishna Arati ..

# ॥ श्री कृष्ण आरती ॥

ऐकोनी कृष्णकीर्ती मन तेथें वेधलें ।
सगुणरूप माये माझ्या जीवीं बैसलें ।
तें मज आवडतें अनुमान न बोले ।
पाहावया रूप याचें उतावीळ हो झालें ॥ १ ॥

यालागीं आरती हो कृष्णा पाही हो सखी ।
आणिक नावडे हो दुजे तिहीं हो लोकीं ॥ धृ ॥

पाऊल कृष्णजीचें माझ्या जीवीं बैसलें ।
सनकादिक पाहा महा आसक्त झाले ।
मुक्त जो शुकमुनी तेणें मनीं धरिलें ।
तें मी केवीं सोडूं मज बहू रुचलें ॥ २ ॥

निर्गुण गोष्टि माये मज नावडे साचें ।
सगुण बोल कांहीं केव्हां आठवी वाचें ।
पाया लागेन तूझ्या हेंचि आर्त मनींचें ।
तेणें घडेल दास्य रमावल्लभाचें ॥ ३ ॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 23, 1999